**स्थलांतरित कामगारांवर सुप्रीम कोर्टाने सु-मोटो (कोर्टाने स्वतःहून घेतलेली) प्रकरणाच्या आदेशाचे मुख्य मुद्दे** :

स्थलांतरित  कामगारांच्या वर जे लॉक-डाउन मुळे संकट ओढ़ावले आहे त्यावर  सुप्रीम कोर्टाने शेवटी एक महत्त्वपूर्ण हस्तक्षेप केला आहे. हा हस्तक्षेप खूपच उशिरा झाला आणि खूपच टोकड़ा आहे. पण उशिरा का होईना त्याचे महत्व आहे आणि त्याचे मुख्य मुद्दे लक्षात घेणे आवश्यक आहेत.

सुप्रीम कोर्टाने केंद्र आणि राज्य सरकारला निर्देश दिले की १५ दिवसांच्या आत स्थलांतरित कामगारांना त्यांच्या घरां पर्यन्त पोहोचविले पाहिजे.

या व्यतिरिक्त, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या मुख्य मुद्द्यांचा सारांश खालीलप्रमाणे आहे:

केंद्र सरकार / राज्य सरकार त्यांच्या राज्यामध्ये अडकलेल्या स्थलांतरित
कामगारांना ओळखण्यासाठी पुढील पावले उचलतील। जे कामगार आपल्या गावी   किंवा ठिकाणी परत जाण्यास इच्छुक आहेत, त्यांच्या परतीच्या प्रवासासाठी सर्व पावले केंद्र सरकार / राज्य सरकार उचलतील. कामगारांच्या ओळख पटवणे, नोंदणी प्रक्रियेचे विकेंद्रीकरण आणि वाहतुकी संदर्भातील माहितीचे प्रसारण  प्रसार माध्यमां मार्फ़त करणे या सर्वांसाठी केंद्र आणि राज्य सरकार जबाबदार असतील.

ज्या 117  श्रमिक गाड्यांची राज्ये / केंद्रशासित प्रदेशांची मागणी आहे त्या व्यतिरिक्त जर  जास्त गाड़्यांची मागणी आली तर २४ तासांच्या आत  केंद्र सरकार अधिक श्रमिक गाड्या उपलब्ध करुन देईल.

केंद्र व राज्य सरकार प्रतिज्ञापत्रे दाखल करतील ज्या मध्ये मूळ ठिकाणी परत आलेल्या प्रवासी कामगारांसाठी असलेल्या  राष्ट्रीय व राज्य स्तरावरील सर्व रोजगार योजनांचा तपशील असेल.

प्रवासी कामगारांना उपलब्ध रोजगार योजनांविषयी माहिती सरकार उपलब्ध करून देईल।   समुपदेशन देण्यासाठी सरकार  सर्व ब्लॉक  व जिल्हा स्तरावर समुपदेशन केंद्रे स्थापन करेल. ही केंद्रे ज्या कामगारांना त्यांच्या पूर्वीच्या नोकरीच्या ठिकाणी परत जायचे असेल, त्यांना परत जायला मदत करतील.

स्थलांतरित कामगारांना लागू असलेल्या कोणत्याही सरकारी योजनांचा लाभ मिळण्यासाठी त्यांच्या मूळ ठिकाणी पोचलेल्या सर्व स्थलांतरित कामगारांचे तपशील गाव, ब्लॉक  व जिल्हावार सरकार ठेवेल .

परत आलेल्या स्थलांतरित कामगारांची संख्या आणि त्यांच्या पूर्वीच्या नोकरी मधील   कौशल्य आणि त्यांना उपलब्ध असलेल्या संधींचा तपशील देणारी प्रतिज्ञापत्र सरकार  दाखल करतील.

आपत्ती व्यवस्थापन कायद्याच्या कलम ५१  किंवा इतर संबंधित तरतुदींनुसार लॉकडाऊन उल्लंघन केल्याच्या तक्रारी दाखल झालेल्या स्थलांतरित कामगारांविरूद्ध सर्व गुन्हेगारी तक्रारी मागे घेण्याचा विचार सर्व राज्ये / केंद्रशासित प्रदेश  करू शकतात.
वरील उपायांमुळे जरी मोठा दिलासा मिळाला असला तरी, कोर्टाच्या निर्णयामुळे उपस्थित काही समर्पक प्रश्नांवर प्रकाश टाकणे देखील महत्त्वपूर्ण आहे:

स्थलांतरित कामगारांच्या ओळख आणि नोंदणी प्रक्रियेमध्ये जबाबदारीची कोणतीही प्रणाली नाही. नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी आणि कामगारांची नावनोंदणी करण्यासाठी त्यांना नजीकच्या पोलिस ठाणे किंवा स्थानिक प्रशासनाच्या ठिकाणी जायचे आहे. त्या आधी पोलिसांच्या संवेदनशीलतेवर आणि कामगारांना मदत करण्यासाठी

गाव / गट / जिल्हास्तरीय पंचायत समिती, नगरसेवक, आमदार यांच्या सक्रिय मदतीवर लक्ष केंद्रित करण्याची खूप गरज होती.

नोंदणी फॉर्म सोप्या आणि कामगारांना समजेल अशा भाषेमध्ये असणे आवश्यक आहे. राज्य / केंद्रशासित प्रदेशातील सरकारांना रोजगाराच्या संधींचा प्रचार करण्यासाठी स्थानिक मीडिया, बिलबोर्ड जाहिराती, रेडिओ आणि इतर मार्गांचा पूर्ण वापर करण्याची विनंती केली पाहिजे.

नोंदणीनंतर स्थलांतरित कामगारांच्या बद्दल मोठ्या प्रमाणावर डेटा (माहिती) गोळा केलेला आहे. हा डेटा संरक्षित ठेवण्या बाबत काळजी घेणे देखील महत्त्वाचे आहे - त्यांची गोपनीयता सुनिश्चित करण्यासाठी काय केले जाईल, लाखो स्थलांतरित कामगारांच्या आकडेवारीचा गैरवापर करणे, त्यांच्या वर पाळत ठेवण्यासाठी त्याचा वापर करणे हे होता कामा नाही.  अनेकांना यापूर्वीही `आधार' च्या बाबतीत या सारख्या अडचणी आल्या आहेत.

श्रमिक गाड्यां मध्ये कामगारांना  अन्न व पाणी दिले जात आहे हे केंद्राचे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाने मान्य केले आहे. परन्तु असंख्य अहवालात असे दिसून आले आहे की गाड्यांमध्ये मूलभूत स्वच्छतेची कमतरता आहे आणि त्यांना अन्नही उपलब्ध नाही. एका दिवसात मृत्यू झालेल्या 9 कामगारांसह ट्रेनमध्ये अनेक मृत्यू झाल्याच्या खात्रीलायक बातम्या आहेत. केंद्राला जास्त गाड्या चालवायला सांगताना ही वस्तुस्थिति लक्षात घेणे आवश्यक आहे. या व् आशा
मूलभूत गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत.

बिहार, उत्तर प्रदेश आणि अन्य राज्य सरकरांचे म्हणणे आहे की ते प्रत्येक प्रवासी कामगाराला त्यांच्या मूळ ठिकाणी जाण्यासाठी 1000 / - रुपये देत  आहेत. हा दावा  न्यायालयाने मंजुर केला आहे. 1000 रुपये पुरेसे नसल्याने अधिवक्ता इंदिरा जयसिंग यांनी सुचवल्याप्रमाणे प्रत्येक कामगारांना 7500 रुपये दिले जावे. अशा प्रकारे न्यायालयाने अंतरिम मदत करावी आणि अधिक रोख लाभास प्रोत्साहन द्यावे हे महत्वाचे आहे.

श्रमिक गाड्या विनाशुल्क चालविल्या गेल्या आहेत याचा काही पुरावा नाही. अनेक अहवालात असे दिसून आले आहे की कामगारांना त्यांच्या ट्रेनच्या तिकिटाचे पैसे द्यावे लागले. कोर्टानेही याकडे लक्ष देणे आवश्यक आहे आणि येत्या काळामध्ये सर्व गाड्या विनाशुल्क असल्या पाहिजेत. प्रत्येक राज्य / केंद्रशासित प्रदेशांना मजदूर हेल्पलाइन / हेल्पडेस्क स्थापित करण्यासाठी आणि ओळख प्रक्रियेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी पुढाकार घेण्याचे निर्देश देण्यात आले होते. गावोगावी जिल्हा ते मध्यवर्ती प्रत्येक स्तरावर जबाबदारी घेण्यासाठी काही यंत्रणा असणे आवश्यक आहे.

राज्य सरकारांनी प्रतिपादन केले की अनेक कामगार आपल्या पूर्वीच्या नोकरीच्या ठिकाणी पुन्हा सामील झाले आहेत. पण अधिक डेटा मागवण्यात आणि याची खोलवर चौकशी करण्यात कोर्ट अपयशी ठरले आहे. घरी परत पाठविल्या गेलेल्या कामगारांच्या संख्येची आकडेवारी देताना, राज्यांनी राहिलेल्या किंवा पुन्हा सामील झालेल्या कामगारांचे खरे मूल्यांकन केलेले नाही. भविष्यासाठी अधिक चांगले तयार होण्यासाठी हे मूल्यांकन करणे आणि त्याचे दस्तऐवजीकरण (डॉक्युमेंटशन) करणे आवश्यक आहे. कोर्टाच्या ऑर्डरमध्ये कोणत्या राज्यांच्या एकूण डेटा आणि आकडेवारी आल्या त्या प्रक्रियेचा उल्लेख नाही। किती कामगार त्यांच्या मूळ ठिकाणी परत गेले आहेत या बद्दल च्या दाव्या चा शहानिशा करणे आवश्यक आहे.  आम्ही या आदेशाच्या अंमलबजावणीचा मागोवा घेत आहोत आणि न्यायालयात परत अहवाल देऊ!